**रेशिम शेती विकास**
**जिल्हास्तरीय योजनेंतर्गत रेशीम सुत उत्पादन अनुदान देणेबाबत. .**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**शासन निर्णय, क्र. रेशीम - केपुयो १४१६/प्र. क्र.९४/रेशीम कक्ष**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २१ मार्च, २०१८

वाचा : १) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक : रेशीम-११०६/ प्र. क्र. ७३/रेशीम कक्ष, दिनांक ८ सप्टेंबर, २०१०
२) संचालक, रेशीम संचालनालय, नागपूर यांचे पत्र जा. क्र. रे. /कार्या-९/ सुत उत्पादन/ जिवायो/ मान्यता/२०१६-१७/४४४, दि. २१.०६.२०१६
३) शासन निर्णय, क्रमांक: धोरण २०१७/प्र.क्र.६/टेक्स-५ दि. १५.०२.२०१८

**प्रस्तावना :-**

रेशीम उद्योग हा कृषी व वनसंपत्तीवर आधारीत रोजगाराची प्रचंड क्षमता असलेला उद्योग आहे. या उद्योगाच्या माध्यमातून ग्रामिण भागातील जनतेचा आर्थिक स्तर व शहरी भागाकडे होणारे स्थलांतरण थांबवणे शक्य आहे. समाजातील सर्व वर्गातील व वयोगटातील लोकांना रोजगाराची संधी देणारा हा एकमेव खात्रीशिर उद्योग आहे. रेशीम उद्योगाचे महत्व, रोजगार निर्मितीला असणारा वाव विचारात घेवून रेशीम उद्योगाला राज्याच्या अर्थव्यवस्थेत केंद्रस्थानी आणण्यासाठी संदर्भ क्रमांक ३ येथील राज्याचे नविन वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ मध्ये अनेक उपाययोजना करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्या अनुषंगाने तुती/ टसर शेतीसाठी खाजगी उद्योजकांना शेतक-यांप्रमाणे तुती/टसर कोषोत्तर प्रक्रीयेसाठी प्रोत्साहन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

रेशीम विस्तार व विकास कार्यक्रमांतर्गत राज्यातील शेतक-यांनी उत्पादन केलेल्या रेशीम कोषाना राज्यातच बाजारपेठ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने राज्यात कोषोत्तर उत्पादन प्रक्रियेला प्रोत्साहन देण्याचे शासनाचे धोरण आहे. त्यानुषंगाने रेशीम सुत उत्पादनावर मल्टीएंड रीलींग युनिट व ॲटोमॅटिक रिलींग युनिट व्दारे उत्पादन होणा-या रेशीम सुताच्या उत्पादनावर प्रती किलो खालील नमूद तपशिलाप्रमाणे अनुदान देण्यास शासन याव्दारे मान्यता देत आहे.

| क्र. | रिलींग युनिट्चा प्रकार | उत्पादित रेशीम सुतास प्रती किलो अनुदान | रेशीम सुताचा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | मल्टीएंड रीलींग युनिट | प्रती किलो रु. १००/- | ग्रेडेबल बायव्होल्टाईन सुत उत्पादन |
| २ | ॲटोमॅटिक रिलींग युनिट | प्रती किलो रु. १५०/- | २ अे ग्रेड व त्यापेक्षा जास्त दर्जेदार बायव्होल्टाईन सुत उत्पादन |
| ३ | टसर रील्ड यार्न | प्रती किलो रु. १००/- | रील्ड यार्न |

२. वरील अनुदान योजनेसाठी पात्र ठरणा-या उद्योजकांची रीलींग युनिट क्षमता व उत्पादीत होणारे रेशीम सुताचा दर्जा इत्यादी बाबत निकष निश्चित करण्याची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येईल.

३. सदर योजना सन २०१८-१९ पासून जिल्हा वार्षिक योजनेत समाविष्ठ करण्यास नियोजन विभाग व वित्त विभागाने मान्यता दिली आहे. त्यानुसार वरील योजना राबविण्यासाठी होणारा खर्च त्या-त्या जिल्ह्यातील जिल्हा नियोजन व विकास निधीतुन भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४९३/१७/व्यय-२ दिनांक २६.१०.२०१७ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३२२१२३०१७३९०२ असा आहे. हा आदेश डिजीटाल स्वाक्षरीन साक्षांकित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ashish Anaclet Lopes

Digitally signed by Ashish Anaclet Lopes
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing And Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=97c1663938db95bf4b157b5906fb45b17fdf64e8db800c9618de046d6e51497c, serialNumber=4c69f8b7f13f76b97aa93b0d155291c61823c6e1d678a555f6eb04d1a38750cf, cn=Ashish Anaclet Lopes
Date: 2018.03.22 12:32:23 +05'30'

**(आ. अ. लोपिस)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,

**प्रति -**

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व अनुज्ञेयता/ऑडीट), मुंबई
२. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा व अनुज्ञेयता/ऑडीट), नागपूर
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
५. सर्व जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी,
६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
७. नियोजन विभाग (का-१४८१), मंत्रालय, मुंबई (दोन प्रती)
८. वित्त विभाग (व्यय-२), मंत्रालय, मुंबई (दोन प्रती)
९. संचालक, रेशीम संचालनालय, (म. रा.), प्रशासकीय इमारत क्रमांक -२, ६ वा माळा, बी - विंग, सिव्हील लाईन्स, नागपूर, ४४० ००१
१०. सर्व सहायक संचालक, प्रादेशीक रेशीम कार्यालय, सहायक संचालक, प्रादेशीक
११. सर्व जिल्हा रेशीम विकास अधिकारी श्रेणी १ / २, जिल्हा रेशीम कार्यालय,
१२. निवड नस्ती (रेशीम कक्ष),